ला.प्र.वि.नंदुरबार कॅम्प नवापुर
दिनांक ०५/०४/२०२१.

**:–प्रेस नोट :–**

**आलोसे श्री.रविंद्र निंबा कानडे, वय ४७ व्यवसाय –पुरवठा निरीक्षक (वर्ग ३) तहसिल कार्यालय नवापुर जि. नंदुरबार –यांनी ८,०००/–रुपये लाचेची मागणी केलेबाबत**

| | |
|---|---|
| **घटक** | नंदुरबार |
| **गुन्हा नोंद कमांक** | नवापुर पोलीस स्टेशन गु.र.नं २४६/२०२१ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (सुधारणा सन–२०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | श्री.रविंद्र निंबा कानडे, वय ४७ व्यवसाय –पुरवठा निरीक्षक (वर्ग ३) तहसिल कार्यालय नवापुर जि. नंदुरबार |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ८०००/– रुपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | निरंक |
| **थोडक्यात माहिती** | यातील मुळ तक्रारदार हे सुशिक्षित बेरोजगार असुन सध्या ते रेशन दुकानावर सेल्समॅन म्हणुन काम करतात ते काम करीत असलेल्या बंधारफळी व बेडकीपाडा येथिल रेशन दुकाने हे त्याचे मामा शिवराम बाबजी गावीत यांचे नावांवर असुन त्यांची तीन ते चार वर्षापासुन प्रकृती बरी राहत नसल्याने सदर रेशन दुकानांचे कामकाज व व्यवहार हे यातील मुळ तक्रारदार पाहत आहेत.<br>यातील मुळ तक्रारदार यांचे रेशन दुकानावरील खातेदार यांचे रेशनकार्ड आधारकार्डाशी जोडणेबाबत शासनाने बंधनकारक केले असुन सदर काम हें तहसिल कार्यालय नवापुर येथिल पुरवठा निरीक्षक श्री.रविंद्र निंबा कानडे यांचेकडेस होते वरील कामासाठी ते त्यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांस सांगितले की,रेशनकार्ड आधारकार्डाशी जोडणेसाठी एका रेशनदुकानाचे दरमहा १०००/–रु. असे दोन्ही दुकानाचे दोन हजार रुपये प्रमाणे एकुण चार महिन्याचे एकुण ८०००/–रु. दयावे लागतील तेंव्हाच मी तुझे काम करुन देईल असे सांगितले होते.असे सांगुन त्यांनी तक्रारदार यांचेकडेस लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांची त्यांना लाच दयावयाची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक २८/०१/२०२१ रोजी अॅकब्यु कार्यालय नंदुरबार येथे लेखी तक्रार दिलेवरुन पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक पुरवठा निरीक्षक श्री.कानडे,तहसिल कार्यालय नवापुर यांनी सांगितले की, तुम्हाला माहीती आहे ना एका दुकानाचे महीन्याला हजार सांगितले आहे ना, तुम्हाला दोघ दुकानाचे तु दोन हजार रुपये गुपचुप देवुन देत जा. आम्ही तुम्हाला काही चारआन्याचा त्रास दयायला येतो का असे सांगुन एकुण चार महिन्याचे ८०००/–रु.लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर यातील लोकसेवक यास तक्रारदार लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार करु शकतो अशी शंका उत्पन्न झाल्याने त्याने तक्रारदाराकडुन पैसे स्विकारले नाहीत.<br>तरी लोकसेवक रविंद्र निंबा कांनडे पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय नवापुर यांनी स्वताचे आर्थिक फायदयासाठी पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करुन लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याने त्याच्याविरुध्द आम्ही सरकार तर्फे फिर्याद दिली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्या येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोवसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री कमांक : १०६४
दुरध्वनी कमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९
व्हॉटस ॲप क. : ९५९४४०१७७७

(शिरीष टी.जाधव)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार

Scanned with CamScanner